# बेस्ट कन्व्हीक्शन ऑफ दि मंथ माहे डिसेंबर – २०१८

## दहिसर पोलीस ठाणे, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | **गु.र.क्र व कलम** | दहिसर पोलीस ठाणे गुरक्र.५३/२०१५ कलम ३६६,३७०,३७०(अ)(२),३४ भादवि सह कलम ४,५ पीटा ॲक्ट |
| २ | **गुन्हा घडला दिनांक** | दिनांक १२/१२/२००८ रोजी ते दिनांक १५/१२/२००८ रोजीचे दरम्यान |
| ३ | **गुन्हयाचे ठिकाण** | साईडवॉक हॉटलेच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ, पश्चिम द्रुतगती मार्ग,एस.एन.दुबे रोड, रावळपाडा जंक्शन, दहिसर (पु), मुंबई. |
| ४ | **फिर्यादी** | श्री.मनोज हरगोविंद गुरानी वय ३९ वर्षे |
| ५ | **बळीत** | नर्गीस मिजारउद्दीन शेख सरदार, वय २० वर्षे |
| ६ | **गुन्हयातील चोरीस गेलेली मालमत्ता** | –– |
| ७ | **हस्तगत मालमत्ता** | –– |
| ८ | **आरोपी अटक** | मो. फिरोज मोहम्मद जब्बार मंडळ वय २७ वर्षे<br>**अटक दिनांक ०४/१२/२०१५ रोजी** |

दहिसर पोलीस ठाणे गुरक्र.५३/२०१५ कलम ३६६,३७०, ३७० (अ) (२),३४ भादवि सह कलम ४,५ पीटा ॲक्ट या गुन्हयात अटक आरोपी मो. फिरोज मोहम्मद जब्बार मंडळ वय २७ वर्षे याने बळीत मुलगी नामे नर्गीस मिजारउद्दीन शेख सरदार, वय २० वर्षे, हिस वेश्याव्यवसाया करिता अन्य ठिकाणाहुन मिळवुन, त्याकरीता प्रवृत्त करून तिच्या कडुन जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करवुन घेवुन बोगस गिऱ्हाईकास वेश्यागमनाकरीता पुरविले व तिचा मोबदला स्वत:च्या उपजीवीकेसाठी स्वीकारला म्हणुन गुन्हा नोंद.

दहिसर पोलीस ठाणेच्या पथकाने नमुद गुन्हयातील आरोपी मो. फिरोज मोहम्मद जब्बार मंडळ वय २७ वर्षे याचा शोध घेवुन त्यास दिनांक ०४/१२/२०१५ रोजी नमुद गुन्हयात रितसर अटक केले. सदर पथकाने कौशल्यपुर्ण व सातत्यपुर्ण तपास करुन आरोपीतांविरूध्द सबळ पुरावा मिळवुन आरोपी विरुध्द मा. सत्र न्यायालय, दिंडोशी, मुंबई येथे कोर्ट केस क्र ११४/२०१५ अन्वये खटला दाखल केला. दहिसर पोलीस ठाणेच्या पथकाने मा. सत्र न्यायालय, दिंडोशी, मुंबई येथे सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन सदर गुन्हयातील पंच, साक्षीदार यांना सुनावणीचे वेळी हजर ठेवून तसेच सबळ परिस्थीतीजन्य पुरावा तसेच वैदयकीय अहवाल, रासायनिक प्रयोगशाळेचे अहवाल विहित वेळेत सादर केला. सदर पथकाने पुरक साक्षीदार/पंच सादर करून मा. सत्र न्यायालय, दिंडोशी, मुंबई यांनी दिनांक २७/१२/२०१८ रोजी आरोपी नामे मो. फिरोज मोहम्मद जब्बार मंडळ वय २७ वर्षे यास खालील प्रमाणे शिक्षा दिलेली आहे.

**मा. न्यायालयाने अटक मो. फिरोज मोहम्मद जब्बार मंडळ वय २७ वर्षे यास दिलेली शिक्षा पुढीलप्रमाणे :–**

**अ)** भादंविसं कलम ३६६,३४ अन्वये ५ वर्षे कठोर शिक्षा व ३०००/– रूपये दंडाची शिक्षा, दंड न भरल्यास ३ महिने शिक्षा.

**ब)** भादंविसं कलम ३७०(अे)(२),३४ अन्वये ५ वर्षे कठोर शिक्षा व ३०००/– रूपये दंडाची शिक्षा, दंड न भरल्यास ३ महिने शिक्षा.

**क)** पिटा ॲक्ट कलम ४ अन्वये २ वर्षे कठोर शिक्षा व रु. १०००/– दंड, दंड न भरल्यास १ महिना साधी शिक्षा.

**ड)** पिटा ॲक्ट कलम ५ अन्वये ५ वर्षे कठोर शिक्षा व रु. १०००/– दंड, दंड न भरल्यास १ महिना साधी कैद.

दोषसिध्द आरोपीताने उपरोक्त सर्व शिक्षा एकत्र भोगायच्या आहेत.

बळीत मुलीस वेश्याव्यवसाया करिता अन्य ठिकाणाहुन मिळवुन, त्याकरीता प्रवृत्त करून तिच्या कडुन जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करवुन घेवुन बोगस गिऱ्हाईकास वेश्यागमनाकरीता पुरविले व तिचा मोबदला स्वत:च्या उपजीवीकेसाठी स्वीकारणाऱ्या आरोपीस दहिसर पोलीस ठाणेच्या पथकाने अटक करून त्याचेविरूध्द दोषारोप पत्र दाखल केले व मा. विशेष सत्र न्यायालय, दिंडोशी, मुंबई येथे सरकारी पक्षातर्फे समर्थपणे बाजु मांडुन सबळ पुरावे व साक्षीदार सादर केल्याने आरोपीस शिक्षा झालेली आहे.

सदर संवेदनशील गुन्हा दोषसिध्द झाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी त्यांना माहे डिसेंबर – २०१८ चे **बेस्ट कन्व्हेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ट गुन्हे दोषसिध्दी पारितोषिकाने सन्मानित केलेले आहे.

**दहिसर पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी/अंमलदार :–**

| अ.क्र. | अधिकारी/अंमलदार यांची नावे | अ.क्र. | अधिकारी/अंमलदार यांची नावे |
|---|---|---|---|
| १ | वपोनि. वसंत नारायण पिंगळे | ५ | पोउनि. राजेंद्र विठ्ठल कदम |
| २ | पोनि. प्रमोद भास्करराव तोरडमल | ६ | पोनाक्र. ९६०२२४/संतोष दामोदर संखे |
| ३ | पोनि. सुरेश किसनराव सहाणे | ७ | पोनाक्र.९७०७१९/सुजित शशीकांत मोरे |
| ४ | मपोउनि. विजया पांडूरंग गिरी | ८ | पोशिक्र.०६०६०९/वैभव शिवाजी चिकणे |

––– ००० –––